डॉ. सुहास विश्वनाथ गानू, वैद्यकीय अधिकारी,
<u>गट-अ यांच्या रुग्णता सेवानिवृत्तीबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः रुसेनि-२०१८/प्र.क्र.११/सेवा-३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत, १० वा. मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: २२ मार्च, २०१९

वाचा :- १) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. मवैअ-१५०८/७५५/प्र.क्र.५४७/०८/सेवा-३, दि.०४.०४.२०१४.
२) महालेखापाल, कार्यालय नागपूर यांचे पत्र क्र.No.PR-1/CH-४/P/१५/१०/६०२२३६८६/ १०१५१४७१०९/P/१५१०/६०१५३३०४/७७८, दि.१८.०९.२०१५.
३) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/२ब/टे५/रुसेनि-डॉ.गानू/ जा.क्र.४६६/ १७, दि.२१/०४/२०१७.

प्रस्तावना :-

डॉ. सुहास विश्वनाथ गानू, वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय चिंचवड जि. गोंदीया, यांना अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर यांनी दि.१२.०९.२००७ रोजीच्या वैद्यकीय प्रमाणपत्रान्वये तसेच वैद्यकीय मंडळ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर यांनी दि.१४.०८.२००८ च्या वैद्यकीय प्रमाणपत्रान्वये मानसिक दृष्ट्या शासकीय सेवा करण्यास कायमचे अपात्र ठरविले आहे. त्यासअनुसरुन अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर यांचे दि.१२.०९.२००७ रोजीचे वैद्यकीय प्रमाणपत्र विचारात घेवून डॉ. गानू यांना वाचा क्र.१ येथील दि.०४.०४.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.१२.०९.२०७ (म. नं.) पासून रुग्णता सेवा निवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. तथापि, त्यास महालेखापाल, नागपूर यांचे कार्यालयाच्या वाचा क्र. २ येथील दि.१८.०९.२०१५ च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे आक्षेप घेतले आहे. “Instead he should have been retired within seven Days from 14.08.2008. i.e. Medical Certificate issued by competent authority”. डॉ. गानू यांच्या रुग्णता सेवानिवृत्ती प्रकरणी महालेखापाल, नागपूर यांनी त्यांच्या दि.१८.०९.२०१५ च्या पत्रान्वये घेतलेल्या आक्षेपानुसार वैद्यकीय अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर हे निम्नस्तर असून अध्यक्ष, वैद्यकीय मंडळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर हे सक्षम असल्याने त्यांनी दि.१४.०८.२००८ रोजी दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे डॉ. गानू यांना दि.१२.०९.२००७ (म. नं.) ऐवजी दि.१४.०८.२००८ (म. नं.) पासून रुग्णता सेवानिवृत्ती मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, वैद्यकीय मंडळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर यांचे दि.१४.०८.२००८ चे वैद्यकीय प्रमाणपत्र विचारात घेवून दि.०४.०४.२०१४ रोजीचे शासन निर्णय अधिक्रमित करुन डॉ. गानू यांना दि.१२.०९.२००७ (म. नं.) ऐवजी दि.१४.०८.२००८ (म.नं.) पासून रुग्णता सेवानिवृत्ती मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

शासन निर्णय :-

उपरोक्त वाचा क्र. १ येथील दि.०४.०४.२०१४ रोजीचे शासन निर्णय याव्दारे अधिक्रमित करण्यात येत आहे.

२. डॉ. सुहास विश्वनाथ गानू, वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय चिंचवड जि. गोंदीया यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६८ ते ८० मधील तरतुदीनुसार दि.१४.०८.२००८ (मं. नं.) पासून "रुग्णता सेवानिवृत्त" झाले असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२२१६४०४५०४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KIRAN VASANTRAO WAHUL

Digitally signed by KIRAN VASANTRAO WAHUL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e32592d7ee16b3f0ea3e5db304272db056899514ece7f762990f9b1a0c5049, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=2e35734ec976bf5657815fb42c4d25b0b3c23b4c69600638f3deb172ac9e37f4, ou=PHD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN VASANTRAO WAHUL
Date: 2019.03.22 04:32:43 -07'00'

(कि. व. वाहुल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा-१, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३) उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर.
४) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, गोंदिया.
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखारीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
६) जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया.
७) डॉ. सुहास विश्वनाथ गानू, वैद्यकिय अधिकारी यांना.
(उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांचे मार्फत)
८) निवडनस्ती सेवा-३.